कनिष्ठ अभियंता / शाखा अभियंता / सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील अभियंत्याची बदली.

महाराष्ट्र शासन
जलसंपदा विभाग, मंत्रालय,
शासन निर्णय क्र : बदली २०१८/(४२/२०१८)/आ.(शा.अ.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : २८ /०२/२०१८.

शासन आदेश:-

महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ मधील कलम ४ (४) आणि ४ (५) मधील तरतुदींनुसार कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत कार्यरत असलेले खालील विवरणपत्रात (स्तंभ-२ मध्ये) नमूद केलेल्या कनिष्ठ अभियंता/ शाखा अभियंता / सहायक अभियंता श्रेणी-२ संवर्गातील अभियंत्याची त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी (स्तंभ ४ नुसार) सार्वजनिक सेवेच्या हितार्थ त्यांच्या विनंतीनुसार बदली करण्यात येत आहे.

अ. क्र.	अभियंत्याचे नाव	कार्यरत असलेले ठिकाण	विनंती बदलीचे ठिकाण
१	२	३	४
१)	श्री.अशोक लक्ष्मण महाजन, शाखा अभियंता	मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक अंतर्गत कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक अंतर्गत वाघाड कालवा उपविभाग क्र.१, दिंडोरी अंतर्गत जलसिंचन शाखा क्र.१ दिंडोरी	मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक अंतर्गत कार्यकारी अभियंता, पालखेड पाटबंधारे विभाग, नाशिक अंतर्गत वाघाड कालवा उपविभाग क्र.१, दिंडोरी अंतर्गत करंजवण धरण शाखा, कादवानगर येथील रिक्त पदी.

२. आदेशात नमूद अभियंत्यांची ज्या कार्यालयात बदली करण्यात आली आहे, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांनी उपरोक्त आदेशातील स्तंभ-४ मध्ये दर्शविल्याप्रमाणे संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत.

३. आदेशात नमूद अभियंता ज्या कार्यालयात कार्यरत आहेत, त्या कार्यालयाच्या संबंधित कार्यकारी संचालक/ मुख्य अभियंता/ अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी बदली झालेल्या संबंधित अभियंत्यांचे सविस्तर पदस्थापनेचे आदेश निर्गमित झाल्यानंतरच बदलीच्या ठिकाणी रुजू होण्यासाठी त्यांना त्वरित कार्यमुक्त करावे. सविस्तर पदस्थापनेचे आदेश प्राप्त झाल्याशिवाय कार्यमुक्त केल्यास व रिक्त पदा अभावी आदेश कार्यान्वित करण्यास अडचणी उद्भवल्यास संबंधित अभियंत्यांना सक्तीचा प्रतिक्षाधीन कालावधी मंजूर करावा लागतो. अशा प्रकरणी संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यास जबाबदार धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

४. संबंधित कार्यकारी संचालक/मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता यांना कळविण्यात येते की, त्यांनी वरीलप्रमाणे संबंधित सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ यांच्या बदलीची अंमलबजावणी करताना सदर बदलीच्या ठिकाणी कोणत्याही परिस्थितीत मंजूर पदांपेक्षा जास्त शाखा अभियंता कार्यरत राहणार नाहीत, याची सर्वार्थाने दक्षता घ्यावी.

५. वरीलप्रमाणे बदली करण्यात येत असलेल्या सहाय्यक अभियंता, श्रेणी-२ यांच्या कार्यमुक्ती आदेशासोबत त्यांचे गोपनीय अहवाल, सेवापुस्तक तसेच अंतिम वेतन प्रमाणपत्र बदली करण्यात आलेल्या नवीन कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावे.

६. सदरचा शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संकेतांक २०१८०२२८१७३८३८४०२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने सांक्षाकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Arvind Vitthalrao Pagar

Digitally signed by Arvind Vitthalrao Pagar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e73e74e98305e43eb295d08ba37550053b948b587f77b90efdc8b9ff16d8e158, serialNumber=3c4bfae11cba198118c1c28e0ff34686b6c0a82a270584a7daed60418b2f32ca, cn=Arvind Vitthalrao Pagar
Date: 2018.02.28 17:38:59 +05'30'

(अरविंद पगार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) मा.मंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
२) मा. राज्यमंत्री (जलसंपदा) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
३) प्रधान सचिव (जसं.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
४) सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई-४०० ०३२.
५) कार्यकारी संचालक, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद.
६) मुख्य अभियंता, उत्तर महाराष्ट्र प्रदेश, जलसंपदा विभाग, नाशिक.
७) अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक.
८) सह सचिव (प्रशा.), जलसंपदा विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९) आ (शा.अ.) कार्यासन संग्रहार्थ.